# बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात

दृष्टि-दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आंतरमहाविद्यालय स्पर्धा   वक्तृत्व, बुद्धिवळ व काव्यवाचन स्पर्धा

## 'व्हिजन २०२४'

२०१८ सालापासून महाविद्यालयातर्फे दृष्टि-दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आंतरमहाविद्यालय स्पर्धा आयोजित करण्यात येतात. सर लुई ब्रेल यांची जयंती (४ जानेवारी) ते पुण्यतिथी (६ जानेवारी) या कालावधीत दृष्टि - दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पुणे शहरातील आंतर-महाविद्यालयीन अशा एकमेव वक्तृत्व, बुद्धिवळ व काव्यवाचन स्पर्धांचे आयोजन केले जाते. मोठ्या उत्साहात विद्यार्थी या स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदवतात. यावर्षी गुरुवार दि. ४ जानेवारी २०२४ रोजी 'व्हिजन 'चे उद्घाटन निवांत अंध मुक्त विकासालयाच्या संचालिका श्रीमती मीराताई बडवे यांच्या हस्ते झाले. पाहुण्यांचा परिचय ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. आसमा बागवान यांनी केला.

आपल्या मार्गदर्शनात मा. मीराताईंनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून अंध विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी केलेल्या कामाबद्दल सांगितले. आपले अनुभव सांगत त्यांनी 'तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विशेष व सामान्य, सर्वच विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहायला हवे' असे प्रेरणादायी भाषण केले. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या डेक्कन एज्यु. सोसायटीच्या प्रबंधक डॉ. सविता केळकर यांनी आयोजक, स्पर्धक व सर्व उपस्थितांचे कौतुक केले व भजनाच्या माध्यमातून प्रेरणा दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर्. पी. कुचेकर यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करत सहवेदनेचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी मा. मीराताईंची सहकारी व महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी उषा हिने सर्व उपस्थितांकडून आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवून पुढे वाटचाल करण्याबद्दल प्रतिज्ञा म्हणून घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी मुस्कान ठाणगे हिने केले. साहाय्यक ग्रंथपाल श्री. संजय साळवे यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर वक्तृत्व स्पर्धा अगदी उत्साहात पार पडली. आजचा युवक, सर लुई ब्रेल यांचे जीवनकार्य तसेच माझा आवडता लेखक या विषयांवर मराठी / इंग्रजी भाषेत वक्तृत्व केले. महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. मेधाविनी वाटवे व ॲड. रेणू पोटे यांनी परीक्षण केले.

व्हिजन च्या दुसऱ्या दिवशी शुक्रवार, दि. ५ जानेवारी रोजी बुद्धिबळ स्पर्धा झाली. उद्घाटनाला प्राचार्य डॉ. आर्. पी. कुचेकर व कार्यालयप्रमुख श्री. ज्ञानेश्वर एडके उपस्थित होते. व्ही. पी. चेस ॲकेडेमीच्या प्रमुख वंदना पोतदार व सहकारी निमीता मंगल परीक्षणासाठी व स्पर्धकांना प्रोत्साहन द्यायला उपस्थित होत्या. श्री. एडके आणि दोन्ही परीक्षकांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. डॉ कुचेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'बुद्धिबळातून निर्णयक्षमतेतील वाढ व बुद्धीचा विकास होतो. त्यामुळे सर्वच दृष्टि-दिव्यांगांनी आपली कौशल्ये जोपासायला हवीत' असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मेधाविनी वाटवे यांनी तर श्री. संजय साळवे यांनी आभारप्रदर्शन केले.
या स्पर्धेत फर्ग्युसन महाविद्यालय, एस. पी. कॉलेज, गरवारे महाविद्यालय, मॉडर्न महाविद्यालय, वाडिया कॉलेज, एम.एम.सी.सी. तसेच बी. एम. सी. सी. येथील २४ विद्यार्थी स्पर्धक म्हणून सहभागी झाले. या प्रसंगी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व उद्योजक श्री. जयप्रकाश सुराणा यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व्यायला स्पर्धेला सदिच्छा भेट दिली. मोठ्या उत्साहात व चिकाटीने स्पर्धेच्या चार फेऱ्या संपन्न झाल्या.

शनिवार, दि. ६ जानेवारी रोजी स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी काव्यवाचन स्पर्धा झाली. मराठी वा हिंदी भाषेत स्वरचित अथवा अन्य कवींच्या दर्जेदार कविता प्रभावीपणे स्पर्धकांनी सादर केल्या. डॉ. मेधाविनी वाटवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्पर्धेचे परीक्षण केले.
तत्पूर्वी निवांत अंध मुक्त विकासालयाच्या मा. उमाताई बडवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'स्वलेखन' या दृष्टि - दिव्यांग विद्यार्थ्यांना टंकन करण्यासाठी (typing) उपयुक्त तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले. स्वावलंबनासाठी त्या तंत्रज्ञानाची गरज सांगितली. सुमारे ३०-३२ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

तिन्ही दिवसांच्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण मा. उमाताई बडवे व डॉ. आसमा बागवान यांच्या उपस्थितीत पार पडला. याशिवाय बी. एम. सी. सी. येथून पदवीचे शिक्षण घेतलेल्या अंध माजी विद्यार्थ्यांचाही यानिमित्त विशेष सत्कार केला. तीन दिवसांच्या या स्पर्धेत फर्ग्युसन महाविद्यालय, स. प. महाविद्यालय, गरवारे महाविद्यालय, मॉडर्न महाविद्यालय, नेस वाडिया महाविद्यालय,

मराठवाडा मित्रमंडळ वाणिज्य महाविद्यालय तसेच बी. एम. सी. सी. येथील विद्यार्थी स्पर्धक म्हणून मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.